विशेष लेख क्र. ३२५

३० कार्तिक १९२८ शके (सायं.५.३० वा.)
सोमवार, दि. २१ नोव्हेंबर, २००६

# पर्यटकांची प्रथम पसंती
# निवास व न्याहारी योजना

**प्रस्थापित पर्यटन स्थळांबरोबरच लहान मोठया पर्यटन स्थळांकडे फिरण्याचा कल गत काही वर्षात पर्यटकांचा दिसत आहे. राज्यातील धार्मिक स्थळे, ऐतिहासिक महत्त्वाच्या जागा, समुद्रकिनारे, डोंगरदऱ्या, जंगले या ठिकाणी पर्यटकांचा ओघ वाढत आहे. मात्र अशा ठिकाणी राहाण्याची उत्तम व्यवस्था नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होण्याची शक्यता असते. स्थानिक संस्कृति, राहाणी,चालीरिती आणि खाद्यपदार्थ यांची ओळख व्हावी अशी अपेक्षाही पर्यटकांची असते. या बाबीं लक्षात घेऊन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने १९९७ मध्ये पर्यटकांसाठी *निवास आणि न्याहारी योजना* हाती घेतली. आजवर राज्यातील २४५ घरमालक या योजनेत सहभागी झाले आहेत. या योजनेला घरमालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पर्यटकांनीही निवास आणि न्याहारी योजनेला प्रथम पसंती दिली आहे.**

या योजनेत सामील झालेल्या घरमालकांना पर्यटकांसाठी उपलब्ध केलेल्या घरावर **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिकृत मंजुरीने** अशी पाटी लावता येते. कोकणात अलिबाग येथे ४८, हरिहरेश्वर २८, मुरुड-जंजिरा १६, सिंधुदुर्ग ३१, ठाणे २१, रत्नागिरी १०, माथेरान १० श्रीवर्धन ५, तर माहिम -केळवा येथे ४ तसेच मुंबईत १८, महाबळेश्वर ३८, कोल्हापूर ११, औरंगाबाद ३, पुणे ६, पंढरपूर १ व अमरावतीत एका ठिकाणी घरमालकांनी निवास व न्याहरी व्यवस्था उपलब्ध करुन दिली आहे.

पर्यटकांची सोय व घरमालकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने ही योजना राज्य शासनाने सुरु केली. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची राज्यात विविध पर्यटन स्थळी स्वतःची पर्यटन संकुले आहेत. मात्र सर्वच ठिकाणी पुरेशी व्यवस्था नाही. काही ठिकाणी हॉटेल व्यवसायीक निवास व्यवस्था देण्यात अपुरे पडतात. बऱ्याच ठिकाणी पर्यटकांचा ओघ ठराविक हंगामात असतो. त्यामुळे छोट्या पर्यटन स्थळी निवासाच्या समस्या निर्माण होतात. हे लक्षात घेऊन किफायतशीर दराने घरगुती वातावरणात पर्यटकाना निवास करता यावा यासाठी ही योजना सुरु झाली.

या योजनेत सामिल होण्यासाठी घरमालकांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची मान्यता मिळवावी लागते. स्वतःच्या मालकीची अथवा मालकाची हरकत नसलेले घर,वाडे, बंगलेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतात. पर्यटकांसाठी कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त दहा खाटांची सोय

**पर्यटकांची प्रथम पसंती.....**

असावी लागते. पर्यटकांसाठी देण्यात येणारी वास्तू स्वच्छ आणि शांत परिसरात असावी सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य मजबूत बांधकाम असलेले आकर्षक घर, बंगला, वाडा असावा. घरमालक स्वत: तेथे राहात असावा जेणेकरुन पर्यटकांची देखभाल शक्य होईल. आरामदायी सुखकारक सहवास मिळण्याच्या दृष्टीने फर्निचर, खाटा, पडदे, दिवे वगैरेंची घरात सोय हवी. खोल्या भाडयाने देण्याचे व न्याहरीसाठी आकारण्यात येणारे दर घरमालक ठरवू शकतात मात्र ते निवास स्थानात प्रदर्शीत करणे आवश्यक आहे.

प्रत्यक्ष पाहणीनंतर एमटीडीसी अशा घरमालकाना या योजनेत सामील करुन घेते. या योजनेत सामिल होण्यासाठी इच्छुक घरमालकाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे अर्ज करावा लागतो.

नोंदणी पात्रतेसाठी १००० रुपये अर्जासोबत भरावे लागतात. प्रत्यक्ष पाहून अहवाल बनविणे आणि नोंदणीपत्र देण्यासाठी विकसित स्थळांच्या बाबतीत २५०० रुपये तर अविकसित स्थळांसाठी १००० रुपये भरावे लागतात. नोंदणीपत्राची मुदत एक वर्षाची असून प्रतीवर्षी नुतनीकरणासाठी १००० रुपये आकारण्यात येतात.

या योजनेत सामिल झाल्यामुळे घरमालकांच्या रिकाम्या जागेचा फायदेशीर उपयोग होतो त्याचबरोबर पर्यटन विकासाला हातभार लागतो. एमटीडीसी कडून प्रसिद्ध होणाऱ्या निर्देशिकेमध्ये अशा घरमालकांचा उल्लेख असतो. अशा जागांचे आरक्षणही एमटीडीसी कडून करण्यात येते मात्र त्यासाठी १० टक्के कमिशन आकारण्यात येते. **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिकृत मंजूरीने** अशी पाटी घरमालकांना लावता येत असल्यामुळे अशा निवास व्यवस्थेला अधिकृतता प्राप्त होते. हे या योजनेचे फायदे आहेत. अधिक माहितीसाठी एमटीडीसीच्या मुंबई दूरध्वनी क्र. २२०२४६२७, पुणे दूरध्वनी क्र. २६१२६८६७, औरंगाबाद दूरध्वनी क्र. २३३१५१३,नाशिक दूरध्वनी क्र. २५७००५९, रत्नागिरी दूरध्वनी क्र. २२३८४७, नागपूर दूरध्वनी क्र. २५३३३२५, सिंधुदुर्ग दूरध्वनी क्र. २२८७८५ व कोल्हापूर दूरध्वनी क्र. २६५२९३५ वर संपर्क साधावा.

**-- मिलिंद सकपाळ**

०००००